सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६२ | गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. भटेश्वर वाणी
पत्रकार



श्री. सतीश कागणे
गायक/शिक्षक



श्री. जगदीश अहिरे
शिक्षक



श्री. शिरीष जैन
अमळनेर



श्री. अनिल घासकडबी
निवृत्त लिपीक



श्री. प्रदीप चौधरी
अमळनेर



सौ. दिव्या जीवनानी (जैन)
संचालिका : दिव्या फॅशन

# उघड्या गटारी, कचऱ्याचे ढीग, सांडपाणी आणि दुर्गंधीचा कहर; भग्न स्वच्छतागृह, बंद दवाखाना

## पैलाड भागातील नागरिकांच्या संतप्त भावना :

## आम्ही खरोखर अमळनेरचेच करदाते नागरिक आहोत का?









(छायाचित्रे : रजनीकांत पाटील) (आणखी छायाचित्रे : पान २ वर)

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पैलाडसह परिसरात स्वच्छता, आरोग्य व पायाभूत सुविधांबाबत प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. पैलाड हा शहरातील रहिवासदृष्ट्या अतिशय मोठा व विविध दृष्टींनी महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. तेथील पांढरी परिसरातील (वॉर्ड क्र. ११) नागरिकांना अस्वच्छता आणि अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. कचरा टाकू नये, असा फलक लावलेला असताना तेथे कचऱ्याचा डेपो तयार झालेला आहे. या भागातील रस्त्यांच्या कडेला उघड्या गटारी असून, त्यात प्लास्टिकचा खच, बांधकामाचा कचरा मोठ्या प्रमाणात साचलेला आहे. त्यामुळे येणाऱ्या दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक कमालीचे हैराण आहेत. याच ठिकाणी मोकाट जनावरांचाही वावर दिसतो. मोकाट जनावरे प्लास्टिक खात असल्याने त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भात नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधितांकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने दुर्गंधीसह राहावे लागते. त्यामुळे प्रशासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



"मी पैलाड भागातील विविध समस्यांसंदर्भात आरोग्य विभागाचे लक्ष वेधण्याचा वारंवार प्रयत्न करीत आहे. मात्र, त्यांच्याकडून मला कोणताही ठोस व सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. काहीतरी ताथूर-मातूर काम करून संबंधित निघून जातात. मी पालिकेत विरोधी गटात असल्यामुळे जाणून-बुजून माझ्या प्रभागाकडे दुर्लक्ष केले जात आहे की काय? अशी शंका मला येऊ लागली आहे. खरेतर शहरातील सर्वच नागरिक करदाते आहेत. पालिकेने सर्वांना सर्व प्रकारच्या समान सोयी-सुविधा दिल्या पाहिजेत. आमच्या सहनशक्तीचा अंत न पाहता पालिकेने तत्काळ युद्धपातळीवर पैलाड भागातील सार्वजनिक आरोग्यासंदर्भातील व साफसफाईच्या सर्व समस्या सोडविल्या पाहिजेत. अन्यथा मला मोठे जनआंदोलन करणे भाग पडेल.

**– विजय कहारू पाटील, नगरसेवक, अमळनेर.**



"पैलाड भागातील पांढरी परिसरात 'कचरा टाकू नये', असा फलक लावून सूचना देण्यात आल्या आहेत. तरीही तेथील काही नागरिक घंटागाडीचा वापर करत नाहीत. शिवाजीनगर परिसरात स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे. स्वच्छतागृहाची लवकरच दुरुस्ती करून ते वापरासाठी सुरू करण्यात येईल. पारोळा रस्त्याकडील नाला जेसीबीच्या सहाय्याने स्वच्छ करण्यात येईल. तसेच काटेरी झाडे-झुडपे काढून जंतुनाशकांची फवारणी करण्यात येईल. येत्या आठ दिवसांत सर्व कामे पूर्ण करण्यात येतील.

**– किरण कंडारे, स्वच्छता निरीक्षक, नगर परिषद, अमळनेर.**



"पैलाड परिसरातील बंद दवाखान्याबाबत मला माहिती नाही. साफसफाईबाबत आज देखील बैठक घेण्यात आली. आज आपण सांगितलेल्या ठिकाणी आमचे एस.आय. व संबंधित मुकादम यांना पाठवून स्वच्छता करण्याचे आदेश देतो. तेथील साफसफाई तसेच जी काही दुरुस्तीची आवश्यकता असेल ती पूर्ण करण्यात येईल. जे नागरिक मोकळ्या जागेत कचरा टाकतील त्यांच्यावर कारवाईसाठी आम्ही एक पथक तयार केले आहे. संबंधितांना नोटीस देऊ अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**– गणेश शिंदे, मुख्याधिकारी, नगर परिषद, अमळनेर.**

अमळनेर-पारोळा या वर्दळीच्या रस्त्यावरील मुख्य मोठी गटार पूर्णपणे सांडपाणी, गाळ आणि प्लास्टिक कचऱ्याने भरलेली आहे. गटारीच्या काठावरील दाट काटेरी झाडे- झुडपे झुकली आहेत. तेथील उकिरड्यावर मेलेली कुत्रे, मांजरी देखील पडलेली पाहावयास मिळाली. यामुळे तेथे अतिशय तीव्र दुर्गंधी होती. उघड्या गटारीत गाळयुक्त काळपट पाणी साचल्याने डासांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर बनत असल्याचे तेथील रहिवाशांनी सांगितले. नियमित साफसफाई व दुरुस्ती होत नसल्याने तेथील नागरिकांना साथीच्या रोगांना सामोरे जावे लागते.

**स्वच्छतागृहाची दैना**

पैलाड भागातील महिला व पुरुषांसाठी उभारलेले सार्वजनिक स्वच्छतागृह पाणी व वीज नसल्यामुळे वापरायोग्य राहिलेले नाही. पुरुषांचे स्वच्छतागृह दरवाजे तुटलेले, परिसरात गवत व काटेरी झुडपे वाढलेली, भिंतींची रंगसफेदी उखडलेली कुठल्याही परिस्थितीत वापरण्यायोग्य राहिलेली नाही. आजूबाजूला कचरा व शेणाचे मोठ-मोठे ढिगारे साचल्याने घाण व दुर्गंधीने नागरिक त्रस्त आहेत. पालिका प्रशासन मात्र मस्त आहे. पैलाड भागातील नागरिकांच्या आरोग्याशी अक्षरशः संतापजनक खेळ खेळला जातो आहे की काय, असे चित्र आहे.

**भग्नावस्थेतील आयुर्वेदिक दवाखाना**

पैलाड भागातील शिवाजीनगरातील मुख्य चौकात असलेला नगरपालिकेचा आयुर्वेदिक दवाखाना मागील तब्बल २० वर्षांपासून पडीत अवस्थेत आहे. जीर्ण झालेली इमारत, गंजलेले दरवाजे, तडे गेलेल्या भिंती धूळ-खात पडलेल्या आहेत. यामुळे पालिकेच्या मालमत्तेचे नुकसान होत आहे. शिवाय नागरिकांना लहान-सहान उपचारांसाठीही दूरवर जावे लागत असून ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे.

### फक्त घोषणा की प्रत्यक्ष कारवाई?

स्वच्छतेच्या घोषणा आणि फलक लावून जबाबदारी संपते का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. नियमितपणे कचरा उचलला जाणे, गटारींची स्वच्छता होणे, स्वच्छतागृहाची दुरुस्ती होणे, बंद दवाखाना सुरू करणे आणि मोकाट जनावरांवर नियंत्रण ठेवणे या बाबींकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. पैलाड भागातील या परिस्थितीमुळे प्रशासनाच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. प्रशासन प्रत्यक्षात ठोस कारवाई केव्हा करेल? घाणीच्या, दुर्गंधीच्या व भग्नावस्थेच्या दुष्टचक्रातून आमची केव्हा सुटका होईल? असा प्रश्न पैलाडवासी उपस्थित करीत आहेत.

### अंगणवाडी भाड्याच्या खोलीत

पैलाड भागात अंगणवाडीसाठी असलेली वास्तू पूर्णतः भग्न झाली आहे. त्यामुळे भाड्याच्या खोलीत अंगणवाडी सुरू आहे. पालिकेने सदर अंगणवाडीची डागडुजी करून तिला वापरण्यायोग्य करणे गरजेचे आहे. अंगणवाडीबाहेर मुलांना खेळण्यासाठी बगिचाही करता येण्यासारखे आहे. प्राथमिक स्वरूपातील शिक्षणाची समाधानकारक सोय नसल्याने अनेक पालकांना त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असूनही न परवडणारी फी भरून खासगी शाळांमध्ये बालकांना रिक्षातून पाठवावे लागते. बालके घरी येईपर्यंत पालकांचा जीव टांगणीला लागलेला असतो.

### ८० फुटी रस्ता झाडांच्या विळख्यात

मागील बाजूस असलेला ८० फुटांचा रस्ता झाडांच्या विळख्यात अडकला आहे. त्यामुळे तो अरुंदही झाला आहे. गटारीअभावी सांडपाणी चक्क रस्त्यावर येते. गटारींची व्यवस्था नसल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर साचते आहे. त्यामुळे चिखल, दुर्गंधी आणि अपघातांचा धोका वाढला आहे. शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांना ये-जा करताना मोठी अडचण निर्माण होत आहे.

# फळपिके पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना लागवड क्षेत्रावर अनुदान मंजूर करा

## काँग्रेसची मागणी : आखाती देशांतील युद्धजन्य स्थितीसंदर्भात प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आखाती देशांत सद्यःस्थितीत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या अनुषंगाने बुधवार, दि. ४ मार्च २०२६ रोजी अमळनेर तालुका काँग्रेसतर्फे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की अमेरिका व इस्त्राईल विरुद्ध इराण अशी सध्या लढाई सुरू आहे. या लढाईचे परिणाम मात्र जगातील इतर देशांवर विस्तृत प्रमाणात होत आहेत. भारतासह महाराष्ट्रासंदर्भात विचार केल्यास जळगाव व नाशिक या जिल्ह्यांतील केळी, द्राक्ष, कांदा व भाजीपाला यांच्या व्यापारावर मोठा परिणाम झालेला आहे. कारण केळी, द्राक्ष या फळांना रमजानचा

पान २ वर



*अमळनेर : आखाती देशांतील युद्धजन्य स्थितीसंदर्भात बुधवारी तालुका काँग्रेसतर्फे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन देताना तालुकाध्यक्ष भागवत केशव सूर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, मनोज पाटील, संदीप घोरपडे, पी. वाय. पाटील, प्रा. श्याम पवार, मगन वामन पाटील, बन्सीलाल भागवत, भगवान संधानशिव, के. व्ही. पाटील, हर्षल जाधव, कैलास पाटील, डॉ. रवींद्र पाटील, सुधाकर भैसे, पीतांबर पाटील, सईद तेली, कुशल मिस्तरी, सुरेश लहू पाटील, विजय पाटील आदी.*

# परंपरेची जुनी बंधने तोडली!

## खेडी व्यव्हारदळे येथे मुलीने दिला पित्याला मुखाग्नी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : समाजात आजही अनेक रूढी-परंपरांचे पालन केले जाते. विशेषतः अंत्यसंस्कारावेळी वडिलांना मुलानेच अग्नी द्यावा, अशी प्रथा प्रचलित आहे. मात्र, खेडी व्यव्हारदळे (ता. अमळनेर) येथे एका मुलीने वडिलांना मुखाग्नी देत परंपरेला छेद दिला पुरोगामी विचारांचा आदर्श निर्माण केला आहे. खेडी व्यव्हारदळे येथील रहिवासी अमृत नागो गजरे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना सर्व सहा मुलीच आहेत. मुलगा नाही. आयुष्यभर कष्टमय जीवन जगलेल्या अमृत गजरे यांच्या वृद्धापकाळात त्यांच्या कन्या मंगलाबाई भीमराव मेराळे यांनी त्यांची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. वडिलांची सेवा, देखभाल आणि सर्व गरजांची पूर्तता त्यांनी मुलाप्रमाणे केली.

वडिलांच्या निधनानंतर अंत्यसंस्काराचा प्रश्न निर्माण झाल्यावर मंगलाबाईंनी स्वतः पुढाकार घेत वडिलांना मुखाग्नी देण्याचा निर्णय घेतला. 'मुलगा आणि मुलगी समान' हा विचार त्यांनी कृतीतून सिद्ध केला. परंपरेने पुरुषांची मक्तेदारी समजल्या जाणाऱ्या या विधीत एका मुलीने अंतिम कर्तव्य पार पाडल्याने गावात तसेच अमळनेर तालुक्यात त्यांच्या धाडसी निर्णयाचे कौतुक होत आहे.

मुलीने वडिलांना मुखाग्नी देण्याची खेडी व्यव्हारदळे येथील पहिलीच घटना असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. या प्रसंगामुळे समाजातील जुन्या विचारसरणीला छेद मिळाला असून, मुलीही सर्व कर्तव्ये समर्थपणे पार पाडू शकतात, असा सकारात्मक संदेश या घटनेतून देण्यात आला आहे. अंत्ययात्रेला गावातील ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंगलाबाईंनी वडिलांना दिलेला मुखाग्नी हा केवळ धार्मिक विधी नसून, पित्याप्रती असलेल्या कृतज्ञतेची आणि प्रेमाची साक्ष असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या ऐतिहासिक घटनेमुळे खेडी व्यव्हारदळे गावाची ओळख आता पुरोगामी विचारांसाठी निर्माण झाली आहे.

वारकरी संप्रदायाचा अखंड ज्ञानदीप



पान ४...

संपादकीय

# परीक्षा पालकांची की विद्यार्थ्यांची ?

आपला मुलगा अमुक-अमुक इयत्तेत उत्तीर्ण झाला आहे, याची माहिती जेव्हा मुलाच्या शिक्षकांकडून किंबहुना वर्तमानपत्र किंवा गावात शहरात चर्चा झाल्यानंतर आई-वडिलांना कळायची. तेव्हा कुठे आपला मुलगा अमूक अमुक इयत्तेत काहीतरी शिकत आहे याची जाणीव आई-वडिलांना व्हायची. कारण त्या काळी पालक इतके असे काही शिक्षित नव्हते. त्यामुळे कदाचित ही परिस्थिती असू शकते. मात्र, सद्यःस्थितीत पालक सुशिक्षित असून आपापल्या मुलांना घडविण्यासाठी जीवनभर खटाटोप करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी विद्यार्थी परीक्षा केंद्रात टेबलवर बसतोतोवर करीत आहेत. याला आधुनिक शिक्षण म्हणावे की सुशिक्षित पिढी म्हणावे हा ज्याच्या त्याच्या सद्सद्विवेक बुद्धीनुसार ठरावे. सगळ्या काही सुविधा असताना आणि आर्थिक ऐपत असताना सुद्धा पालकांना मुलांची एवढी भीती परीक्षेसंदर्भात का असावी हा प्रश्न. पालकांनी मुलांना हाताला धरून कुठपर्यंत चालवायचे याचा विचार पालकांनी कधी केला आहे का? आज सुशिक्षित समाजात किती मुलांना करिअर निवडण्याची संधी दिली जाते. मुलांना आई-वडील ठरवतील त्यात करिअर आणि शिक्षण त्या पद्धतीचे दिले जाते. या अगोदर असे काही नव्हते. कारण आई-वडील अशिक्षित किंवा अल्पशिक्षित होते. त्यामुळे करिअर आणि शिक्षण काय घ्यावे याचे उत्तम भान त्या काळी मुलांना, विद्यार्थ्यांना होते. आज तसे राहिले आहे का? पालक मुलांकडे परीक्षेपर्यंत जाऊन करिअर काय करावे इथपर्यंत धसास नेतात. हे किती योग्य आहे याचा विचार पालक म्हणून करावा.

मलांना खरेतर प्राथमिक शिक्षणापर्यंत हात पकडून नेण्याची वेळ असते. मात्र, मुलांना स्वतंत्र आणि धाडसी विचाराचे कधी बणविणार आहोत? मुलगा दहावी झाला आहे की बारावी उत्तीर्ण झाला आहे याची कुठलीही पुसटशी माहिती कधीकाळी आई-वडिलांना किंबहुना कुटुंबातील कोणालाच नव्हती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण शिक्षण हे सर्वसामान्यांसाठी दूरचे होते. मात्र, त्याही कठीण परिस्थितीत शिक्षणाची ओढ असणारी पिढी मोठ्या हिमतीने आणि चुरशीने अभ्यास करून परीक्षेस सामोरे जात होती. याचा मतलब आजची पिढी अभ्यासू नाही असा नव्हे. आपला मुलगा कितव्या इयत्तेत आहे हे आई-वडिलांना माहिती नव्हते. परंतु आता आई-वडीलच मुलांना परीक्षा केंद्रात घेऊन जातात यावरून नेमकी परीक्षा पालकांची की मुलांची आहे असे वाटते. कारण की परीक्षा केंद्रात परीक्षार्थींची गर्दी कमी आणि पालकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून येते. नेमकी विद्यार्थ्यांना भीती कशाची असावी की पालक विद्यार्थ्यांच्या केंद्रापर्यंत येतात. यावरून मुलांना शिक्षकांनी कसे घडवले याचे प्रचिती येते. मूल्यशिक्षण हा शाळेतील एक भाग असून ही गर्दी पाहता आपण मूल्यशिक्षण किती घेतले याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा. कारण प्रत्येक परीक्षा केंद्रात पालकांची गर्दी दिसून येते. यावरून मुलांना किंबहुना परीक्षार्थीना कशाची भीती वाटत असावी, हाही प्रश्न पडतो. मेहनतीने आणि चुरशीने अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात पालक घेऊन येण्याची गरज का वाटते? तर काही परीक्षा केंद्रावर परीक्षार्थीचे अख्खे कुटुंब परीक्षार्थीना कॉपी पुरविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करताना बातम्यांमधून दिसून येतात.

माणूस दिवसेंदिवस टेक्नोसेव्ही होत असताना तितकाच तो भित्रा झाला आहे. म्हटले तर योग्य, कारण पूर्वी परीक्षेची भीती विद्यार्थ्यांना नसायची. परंतु आता रात्रंदिवस अभ्यास करूनही परीक्षार्थीना परीक्षेची भीती वाटते. परीक्षेला सामोरे जाण्यासाठी कुठेतरी सोबतीला परीक्षा केंद्रासोबत कुटुंबातील सदस्य असावा असे वाटणे, मुळात हीच भीती म्हणता येईल. खरेतर परीक्षा ही ॲकॅडमिक इयरसाठी असते यावरून जीवन जगताना अनेक परीक्षांना सामोरे जावे लागत असते. त्यामुळे ही परीक्षा केवळ विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष म्हणून पाहिली तर तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल. तर पालकांची होणारी गर्दीही कमी होईल. मात्र, परीक्षा जणू काही मोठे अग्निदिव्य असल्यासारखी भावना विद्यार्थ्यांच्या मनात पिढ्यान पिढ्या कुटुंबाकडून आलेली असते. त्यामुळेच विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाताना धाडसाने जात नाहीत. परंतु विद्यार्थ्यांना पालकांनी धीट केले तर पालकांना परीक्षा केंद्रात गर्दी करण्याची गरज मुळीच पडणार नाही, पण लक्षात कोण घेतो. ही भीती आजच्या स्पर्धेच्या युगाची कुठेतरी चुणूक असल्याने निर्माण झाली आहे? विद्यार्थ्यांनी पालकांना सोबत न आणता धीट परीक्षेस सामोरे गेले पाहिजे. पालकांनी सुद्धा आपल्या पाल्यांना सक्षम आणि निर्भीड बनविण्याचे संस्कार दिले पाहिजेत. त्यामुळे विद्यार्थ्यांपेक्षा पालकांचा विद्यार्थ्यांच्या परीक्षेविषयी असलेला ताण कमी होईल; अन्यथा परीक्षा मुलांची की पालकांची? या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरीतच राहील.

## फळपिके पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना लागवड क्षेत्रावर अनुदान मंजूर करा

**पान १ वरून :** महिना सुरू असल्याने सध्या आखाती देशांकडून मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्या अनुषंगाने भावही याच महिन्यात चढत्या दराने मिळतात. मात्र, युद्धजन्य स्थितीमुळे बंदरांवर निर्यातीसाठी आलेले केळी, द्राक्ष, भाजीपाला यांचे हजारो कंटेनर पडून आहेत. शेतकऱ्यांकडून माल घेणारे व्यापारी या परिस्थितीचा फायदा घेत आहेत. अडीच हजार रुपये प्रतिक्विंटलप्रमाणे विकली जाणारी केळी व्यापारी दीड हजार रुपये क्विंटलप्रमाणे मागणी करीत आहेत. तीच परिस्थिती द्राक्ष, कांदा यांच्याबाबतीतही आहे. त्यात केळी, द्राक्ष, कांदा व भाजीपाला हे नाशवंत असल्याने ते साठवून ठेवता येत नाहीत. अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. त्यामुळे अमळनेर तालुका काँग्रेसने केळी, द्राक्ष, कांदा ही फळ पिके पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना लागवडीच्या क्षेत्रावर अनुदान मंजूर करावे तसेच भारतासह इतर देशांतील व्यापारी, खेळाडू, पर्यटक, विद्यार्थी हे आखाती देशांत विमान सेवा खंडित झाल्याने अडकून पडले आहेत. त्यांना केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार यातील आमदार, खासदार यांनी भारतात आणण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केलेली आहे. निवेदन देतेवेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत केशव सूर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, मनोज पाटील, संदीप घोरपडे, पी. वाय. पाटील, प्रा. श्याम पवार, मगन वामन पाटील, बन्सीलाल भागवत, भगवान संधानशिव, के. व्ही. पाटील, हर्षल जाधव, कैलास पाटील, डॉ. रवींद्र पाटील, सुधाकर भैसे, पीतांबर पाटील, सईद तेली, कुशल मिस्तरी, सुरेश लहू पाटील, विजय पाटील आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## पैलाडमधील घाण व दुर्गंधीने माखलेला परिसर















## विश्व मराठी साहित्य संमेलनात अमळनेरचे जगताप यांना पुरस्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नाशिक येथे २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ दरम्यान चौथे विश्व मराठी साहित्य संमेलन झाले. त्यात अमळनेरचे सुपुत्र तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील जगताप यांच्यासह सहकाऱ्यांचे विशेष योगदान लाभले. याची दखल घेऊन श्री. जगताप यांना मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील नाट्य व चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्यासह विविध मान्यवरांच्या उप ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्या दालनात पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. श्री. जगताप सध्या नाशिक जिल्हा ग्रंथालय अधिकारी म्हणून सेवेत आहेत.

या संमेलनास ज्येष्ठ मराठी चित्रपट दिग्दर्शक महेश मांजरेकर यांचीही उपस्थिती लाभली होती. श्री. जगताप यांना मिळालेला हा पुरस्कार अमळनेरकरांसाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे. ग्रंथालय संचालनालयाच्या या यशामुळे अमळनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



*अमळनेर : नाशिकमधील चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाप्रसंगी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील नाट्य व चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्या दालनात पुरस्कार स्वीकारताना अमळनेरचे सुपुत्र तथा नाशिक जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील जगताप.*

# इंग्लंडविरुद्ध भारताचे पारडे जड; माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांचे मत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात भारतासमोर इंग्लंड संघाचे आव्हान असणार आहे. ही लढत वानखेडे स्टेडियमवर होणार असून, यामध्ये यजमानांचे पारडे जड असेल, असे मत भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केले आहे.





टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा पराभव वगळल्यास सर्व सामन्यांत विजय नोंदविले आहेत. दुसरीकडे इंग्लंड संघानेही चमकदार कामगिरी केली आहे. त्यामुळे हा सामना चुरशीचा होईल, असे वेंगसरकर यांना वाटते. भारताने 'अव्वल आठ' फेरीतील अखेरच्या सामन्यात वेस्ट इंडिजला नमवीत उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. या लढतीत संजू सॅमसनने भारताकडून निर्णायक खेळी केली.

**'पॉवरप्ले'मधील आक्रमण निर्णायक**

'टी-२० प्रारूपात पहिल्या सहा षटकांना सामन्याचा पाया मानले जाते. या कालावधीत ६० ते ७० धावांची उभारणी झाली, तर मोठ्या धावसंख्येकडे वाटचाल सोपी होते. मात्र, सुरूवातीलाच २५-३० धावांवर गडी बाद झाल्यास संघावर दबाव वाढतो. त्यामुळे आक्रमकता आणि संयम यांचा समतोल साधत खेळणे भारतीय फलंदाजांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे,' असे वेंगसरकर यांनी सांगितले.

**योग्य फटक्यांची निवड आवश्यक**

'केवळ आक्रमक फटकेबाजीपेक्षा योग्य फटक्यांची निवड केल्यास मोठी धावसंख्या उभारणे शक्य होऊ शकते. वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यात संजू सॅमसन याने दाखवून दिले, की योग्य फटक्यांची निवड आणि गडी हातात राखत खेळल्यास २०० धावांचा टप्पाही गाठता येतो. शेवटच्या तीन-चार षटकांत आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्ध्यावर दडपण आणणे ही भारताची ताकद ठरू शकते,' असे वेंगसरकर म्हणाले.

**इंग्लंडची फलंदाजी सक्षम**

'इंग्लंडचा संघ संतुलित आणि आक्रमक आहे. त्यांच्या फलंदाजी फळीमध्ये अनुभव आणि युवा खेळाडू यांचा सुरेख मेळ आहे. हॅरी ब्रूक यासारखा खेळाडू काही षटकांत सामन्याचे चित्र पालटू शकतो. त्यामुळे इंग्लंडला कमी लेखण्याची चूक भारताने करू नये,' असे वेंगसरकर म्हणाले.

### मधल्या षटकांतील नियंत्रण महत्त्वाचे

'इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात भारताच्या गोलंदाजांवर मोठी जबाबदारी असेल. चेंडू योग्य टप्प्यावर राखत धावगतीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. विशेषतः मधल्या षटकांत इंग्लंडच्या आक्रमक फलंदाजांना रोखणे भारतासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. कुलदीप यादवसारख्या गोलंदाजाला अंतिम अकरामध्ये स्थान मिळाल्यास कदाचित इंग्लंडच्या अडचणी वाढू शकतात. पण, सध्याची स्थिती पाहता संघरचनेत मोठा बदल अपेक्षित नाही,' असे वेंगसरकर यांना वाटते.



## भारताच्या १०० रुपयांमध्ये इराणमध्ये काय काय विकत घेता येऊ शकते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कालपर्यंत इराण अमेरिकेला चांगलाच नडणार असे वाटत होते. पण त्यांचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनी ठार झाल्याने इराण अजून किती दिवस युद्धाचे ओझे सोसणार हा खरा प्रश्न आहे. गेल्या काही दिवसात इराणच्या चलनाचे मूल्य घसरले आहे. आता १०० रुपयांमध्ये इराणमध्ये काय काय विकत घेता येईल?

कालपासून इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर क्षेपणास्त्रांचा पाऊस पाडला. त्याला इराणने जोरदार प्रत्युत्तर दिले. इराणने शेजारील आठ देशांमधील अमेरिकेच्या लष्करी, नौदलाच्या तळावर क्षेपणास्त्र डागले. सौदी अरबमध्ये तर इराणने तुफान हल्ला चढवला.

सध्या मध्य-पूर्वेतील या नवीन टेन्शनमुळे खनिज तेलाच्या किंमती आणि चलनांचे मूल्य बदलण्याची दाट शक्यता आहे. अमेरिकेला इराणमधील तेल साठ्यांवर नियंत्रण मिळवायचे आहे. त्यासाठी इस्त्रायलच्या मदतीने हे हल्ले केले जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. पण यामुळे इराणच्या चलनाचे मूल्य खूप घसरले आहे. इराणचे अधिकृत चलन हे इराणी रियाल आहे. युद्धाचे ढग गेल्या काही दिवसांपासून गडद झाल्याने आणि या देशावर विविध आर्थिक निर्बंध लादल्याने इराणी रियालचे मूल्य जागतिक स्तरावर अत्यंत घसरले आहेत. या घाडमोडींमुळे भारतीय रुपया इराणमध्ये अधिक मौल्यवान ठरला आहे. मार्च महिन्यातील ताज्या विनिमय दरानुसार, १ भारतीय रुपया १४,४३४ इराणी रियाल इतका आहे. या हिशेबाने १०० भारतीय रुपये, १४४३४३०.५१ इराणी रियाल इतका आहे. म्हणजे आपल्याकडे शंभर रुपये तिकडे १४ लाखांहून अधिक रियाल होतात. अर्थात हा विनिमय दर दिवसागणिक बदलू शकतो.

इराणमध्ये १ लिटर दूध ५,००००० रियाल म्हणजे भारतीय रुपयात ३५ रुपये लिटर आहे. १ डझन अंडी ७,००००० ते ८,००००० रियाल म्हणजे ५० ते ५५ रुपये इतकी आहे. तर एक पाव १,५०००० रियाल म्हणजे १० रुपयांमध्ये मिळतो. म्हणजे शंभर रुपयात तीन वस्तू तेथे खरेदी करता येतात. तर एक लिटर पेट्रोल हे १० रुपयांच्या आत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# शुरू हो गया विनाश?

## बाबा वेंगा की 'तीसरे विश्व युद्ध' वाली भविष्यवाणी ने इंटरनेट पर मचाया हड़कंप!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ईरान पर हमला, पाक-अफगान जंग और यूक्रेन संकटा क्या २०२६ में बाबा वेंगा की 'तीसरे विश्व युद्ध' वाली भविष्यवाणी सच होने वाली है? जानिए दुनिया पर मंडराते इस बड़े खतरे का पूरा सच... सोशल मीडिया पर इन दिनों बाबा वेंगा की तीसरे विश्व युद्ध को लेकर की गई भविष्यवाणी एक गरमागरम चर्चा का विषय बन गई है। इसकी मुख्य वजह अमेरिका और इजरायल द्वारा ईरान पर किया गया हमला और उसके जवाब में ईरान द्वारा यूएई, बहरीन और कतर जैसे खाड़ी देशों को निशाना बनाना है। इसके साथ ही दुसरी तरफ पाकिस्तान-अफगानिस्तान एक दूसरे के साथ भिड़े हुए हैं तो वहीं रूस-यूक्रेन युद्ध ने इस आग में घी डालने का काम किया है। बाबा वेंगा को मानने वालों का दावा है कि उन्होंने २०२० के दशक के मध्य में एक ऐसे विनाशकारी युद्ध की भविष्यवाणी की थी, जो दुनिया की महाशक्तियों और पुराने संबंधों को पूरी तरह से बदल कर रख देगा। बाबा वेंगा के मानने वालों का कहना है कि उनकी भविष्यवाणियां इस बढ़ती अस्थिरता और कूटनीतिक तनाव के एक ऐसे दौर की ओर इशारा कर रही है, जो अंततः एक बड़े टकराव में बदल जाएगा।

मानने वालों का कहना है कि भले ही बाबा वेंगा ने कोई लिखित दस्तावेज नहीं छोड़ा, लेकिन आज की स्थिति को देखकर ऐसा लग रहा है कि उनकी भविष्यवाणी सच साबित हो रही है। हालांकि, वर्तमान स्थिति अभी पूरी तरह विश्व युद्ध में नहीं बदली है, लेकिन इन भू-राजनीतिक संघर्षों को तुरंत रोकने की जरूरत है।

### अमेरिका-इजरायल का ईरान पर हमला

शनिवार को अमेरिका और इजरायल दोनों ने मिलकर ईरान पर हमला शुरू कर दिया। पहला हमला कथित तौर पर सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनेई के कार्यालय के पास हुआ। राजधानी तेहरान समेत पूरे देश से धुएं के गुबार उठते देखे गए। राष्ट्रपति डोनाल्ड ट्रंप ने सोशल मीडिया पर कहा कि अमेरिका ने ईरान में 'बड़े सैन्य अभियान' शुरू कर दिए हैं। उनका दावा है कि ईरान लगातार अपना परमाणु कार्यक्रम बढ़ा रहा है और ऐसी मिसाइलें बना रहा है जो अमेरिका तक पहुंच सकें।

### रूस की तीखी प्रतिक्रिया

रूस ने इस हमले की कड़ी आलोचना करते हुए इसे 'खतरनाक और गैर-जिम्मेदाराना' बताया है. रूसी विदेश मंत्रालय का कहना है कि अमेरिका और इजरायल पूरे मध्य पूर्व को तबाही की खाई में धकेल रहे हैं, जिससे एक मानवीय और आर्थिक संकट पैदा हो सकता है। रूस के सुरक्षा परिषद के उपाध्यक्ष दिमित्री मेदवेदेव ने ट्रंप पर तंज कसते हुए कहा कि शांति की बातें सिर्फ एक दिखावा थीं। उन्होंने ईरान की प्राचीन सभ्यता का हवाला देते हुए अमेरिका के वजूद पर ही सवाल उठा दिए।

### पाकिस्तान-अफगानिस्तान के बीच 'खुली जंग'

पाकिस्तान और अफगानिस्तान के बीच तनाव अब 'खुली जंग' में बदल चुका है। पाकिस्तान ने शनिवार सुबह अफगानिस्तान के अंदर सैन्य ठिकानों पर हवाई और जमीनी हमले किए। पाकिस्तान का दावा है कि उन्होंने अब तक ३०० अफगान सैनिकों को मार गिराया है, हालांकि अफगानिस्तान ने इन आंकड़ों को गलत बताया है। पाकिस्तानी रक्षा मंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ ने साफ लहजे में कहा, 'हमारा सब्र अब जवाब दे गया है, अब हमारे बीच सीधी जंग है।" यह टकराव पिछले रविवार को पाकिस्तान द्वारा किए गए हवाई हमलों के बाद शुरू हुआ।

### रूस-यूक्रेन युद्ध का ताजा मोड़

रूस के रक्षा मंत्रालय ने शनिवार को घोषणा की कि उनकी सेना ने यूक्रेन के नेस्कुचने और गिर्के बस्तियों पर कब्जा कर लिया है। खबरों के मुताबिक, रूस अब अमेरिका की अगुवाई वाली शांति वार्ता में ज्यादा दिलचस्पी नहीं दिखा रहा है। उनका कहना है कि जब तक यूक्रेन अपनी जमीन छोड़ने को तैयार नहीं होता, बातचीत का कोई मतलब नहीं है। अगले हफ्ते होने वाली बैठकें यह तय करेंगी कि क्या यह युद्ध कभी खत्म होगा या नहीं।



# इराणचे सुप्रीम लीडर खामेनी किती श्रीमंत होते?

## त्यांची कमाई नेमकी कुठून होत होती? जाणून घ्या सर्व माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्यांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

अमेरिका आणि इस्रायली हल्ल्यांदरम्यान इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूची बातमी समोर आली आहे. खामेनी यांनी १९८९ पासून इराणचे सर्वोच्च नेते म्हणून काम केले आणि सुमारे ३६-३७ वर्षे देशाचे सर्वात शक्तिशाली पद भूषवले. त्यांनी स्वतःला साधेपणाचे जीवन जगणारे धार्मिक नेते म्हणून वर्णन केले, परंतु आंतरराष्ट्रीय तपासात त्यांनी नियंत्रित केलेल्या आर्थिक नेटवर्कबद्दल महत्त्वपूर्ण दावे करण्यात आले आहेत.

### खामेनींकडे किती संपत्ती?

२०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था रॉयटर्सच्या एका तपास अहवालात असा दावा करण्यात आला होता, की खामेनींकडे सुमारे ९५ अब्ज डॉलर्स किमतीची मालमत्ता होती. भारतीय चलनात ही रक्कम विनिमय दरानुसार अंदाजे ८.५ लाख कोटी इतकी आहे. अहवालात असे म्हटले आहे, की ही संपत्ती थेट त्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात ठेवण्यात आली नव्हती, तर ती एका मोठ्या संस्थेद्वारे नियंत्रित करण्यात आली होती.

### खामेनींची कमाई कशातून होत होती?

खामेनी यांच्या संपत्तीचा मुख्य स्रोत 'सेताद' नावाची संस्था असल्याचे सांगितले जाते. ही संस्था १९७९ च्या इराणी क्रांतीनंतर स्थापन करण्यात आली. त्या काळात अनेक व्यक्ती आणि कुटुंबांची मालमत्ता जप्त करण्यात आली होती. या जप्त मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी ही रचना उभी करण्यात आली. सेतादकडे स्थावर मालमत्ता (रिअल इस्टेट), कंपन्यांचे समभाग, तेल व ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणूक, बँकिंग आणि इतर व्यवसायांतील हिस्सेदारी असल्याचे सांगितले जाते. अहवालांनुसार ही संस्था इराणच्या संसदेला किंवा सार्वजनिक देखरेख यंत्रणांना थेट जबाबदार नव्हती. तिचे संचालन थेट सर्वोच्च नेत्यांच्या कार्यालयाच्या अखत्यारीत होते, असे मानले जाते.

### अलीकडील अहवालांमध्ये किती संपत्तीचा दावा?

२०२५-२०२६ मधील काही अहवालांमध्ये असा दावा करण्यात आला की खामेनी यांच्या नियंत्रणाखालील संपत्ती ९५ अब्ज डॉलर्सवरून वाढून सुमारे २०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली असावी. मात्र या दाव्यांची स्वतंत्र पुष्टी उपलब्ध नाही. तसेच हा अंदाज कोणत्या मालमत्ता आणि गुंतवणुकींचा समावेश करून लावण्यात आला आहे, हेही स्पष्ट नाही. महत्त्वाचे म्हणजे ही रक्कम रोख स्वरूपातील नसून कंपन्या, जमीन, समभाग आणि विविध क्षेत्रांतील गुंतवणूक या स्वरूपात असल्याचे सांगितले जाते.



### कोणत्या क्षेत्रांत होती हिस्सेदारी?

अहवालांनुसार, सेतादची इराणमधील अनेक प्रमुख क्षेत्रांमध्ये हिस्सेदारी आहे. यामध्ये तेल आणि ऊर्जा, दूरसंचार, बँकिंग, शेती, उद्योग आणि रिअल इस्टेट यांचा समावेश आहे. तेल आणि वायू हे इराणच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. या क्षेत्रांमधील महत्त्वपूर्ण हिस्सेदारी संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करते. म्हणूनच खामेनींच्या नियंत्रणाखालील आर्थिक रचना प्रभावी मानली जात होती.

### संपत्ती पूर्णपणे खाजगी होती का?

अहवालांनुसार सेतादकडे अर्ध-सरकारी रचना म्हणून पाहिले जात होते. ही संस्था थेट इराणच्या सर्वोच्च नेत्यांना अहवाल देत होती, मात्र तिच्या कामकाजाबाबत सार्वजनिक पारदर्शकता मर्यादित होती. इराणच्या व्यवस्थेत सर्वोच्च नेत्यांच्या कार्यालयाच्या आर्थिक तपशीलांची सविस्तर माहिती सार्वजनिकरित्या उघड केली जात नाही. त्यामुळे खामेनी यांच्या एकूण संपत्तीबाबत विविध आकडे समोर येत राहिले आहेत.



# इराणकडून भारत काय आयात करतो?

## युद्ध भडकल्यास कोणत्या वस्तू महागणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पश्चिम आशियामध्ये वाढत चाललेल्या तणावाचा परिणाम केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे पडसाद जागतिक अर्थव्यवस्थेवर उमटतात. इराण आणि इस्रायलमधील संघर्ष तीव्र होत असताना भारतासाठीही ही परिस्थिती चिंतेची ठरू शकते. ऊर्जा, व्यापार आणि समुद्री मार्गांच्या सुरक्षेशी संबंधित अनेक मुद्दे समोर आले आहेत.

भारत आणि इराण यांचे संबंध दीर्घकालीन आहेत. १९५० मध्ये दोन्ही देशांमध्ये औपचारिक राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. त्यानंतर व्यापारिक देवाणघेवाण वाढत गेली. अमेरिकन निर्बंधांनंतरही पर्यायी देयक पद्धती वापरून दोन्ही देशांनी संबंध टिकवले.

### भारतासाठी इराणचे महत्त्व

इराण हा भारतासाठी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा देश आहे. भारताने चाबाहार बंदर येथे गुंतवणूक केली आहे. हे बंदर अफगाणिस्तान आणि पश्चिम आशियात मालवाहतुकीसाठी रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते. याशिवाय पर्शियन आखातातून भारत मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करतो. या पार्श्वभूमीवर पश्चिम आशियातील अस्थिरता भारतासाठी थेट परिणाम करणारी ठरू शकते.

### भारत इराणकडून काय आयात करतो?

**१) कच्चे तेल**

इराण पूर्वी भारताचा प्रमुख तेल पुरवठादार होता. सध्या आयात कमी असली तरी जागतिक बाजारात पुरवठा विस्कळीत झाल्यास तेलाचे दर वाढू शकतात. त्याचा थेट परिणाम पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर होतो.

**२) पेट्रोकेमिकल आणि रासायनिक उत्पादने**

प्लास्टिक, खत, औषधनिर्मिती आणि उत्पादन क्षेत्रात वापरली जाणारी काही रसायने भारत इराणकडून आयात करतो. पुरवठा साखळी खंडित झाल्यास उत्पादनखर्च वाढण्याची शक्यता आहे.

**३) सुकामेवा आणि फळे**

पिस्ता, खजूर, केशर यासारखा सुकामेवा तसेच काही फळे भारतात इराणमधून येतात. युद्धामुळे वाहतूक अडथळली तर या वस्तू महागू शकतात.

### हॉर्मुज सामुद्रधुनीचा धोका

हॉर्मुज सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाच्या तेलवाहतूक मार्गांपैकी एक आहे. भारताच्या कच्च्या तेल आयातीपैकी मोठा हिस्सा याच मार्गाने येतो. या मार्गात अडथळा निर्माण झाल्यास भारताच्या एकूण मासिक आयातीपैकी जवळपास ५० टक्के हिस्सा प्रभावित होऊ शकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलदर वाढण्याची शक्यता आहे.

### शिपिंग आणि विमा खर्च वाढण्याची शक्यता

पश्चिम आशियातील तणाव वाढल्यास समुद्री मार्गांवरील जोखीम वाढते. जहाजांचा विमा प्रीमियम वाढतो आणि मालवाहतुकीचा खर्च महागतो. याचा परिणाम केवळ तेलावर नाही तर इतर आयात-निर्यातीवरही होतो. लॉजिस्टिक्स खर्च वाढल्यास निर्यात स्पर्धात्मकतेवर परिणाम होऊ शकतो.

### सामान्य नागरिकांवर परिणाम

तणाव दीर्घकाळ टिकल्यास पेट्रोल-डिझेल, घरगुती गॅस, हवाई भाडे, वाहतूक खर्च, खाद्यतेल, पॅकेज्ड वस्तू आणि सुकामेवा यांचे दर वाढू शकतात. ऊर्जा महागल्याने सर्वच क्षेत्रांचा खर्च वाढतो आणि त्यातून महागाई वाढण्याची शक्यता निर्माण होते.


# 'नासा' सोडून भारतात परतले; ५ वेळा करिअर बदलले

## कधी काळी स्पेस सायंटिस्ट होते अंकुर वारिकू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

जर एखादा 'नासा'मध्ये सायंटिस्ट बनण्याच्या मार्गावर असेल आणि अचानक म्हणाला, की 'मजा येत नाही', तर ते ऐकून आश्चर्य वाटणे स्वाभाविक आहे. पण अंकुर वारिकू यांनी नेमके हेच केले. त्यांनी आपली पीएच.डी अर्धवट सोडली. कारण त्यांना उमगले की फक्त एखाद्या गोष्टीत चांगले असणे पुरेसे नाही, तर त्यातून आनंद मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांची ही कहाणी अशा लोकांसाठी आहे, जे करिअरबाबत गोंधळलेले आहेत किंवा अपयशाची भीती बाळगतात.



अंकुर वारिकू यांनी त्यांच्या करिअरमध्ये अनेक मोठे बदल केले. ते एस्ट्रोफिजिक्समधून मॅनेजमेंट कन्सल्टिंगमध्ये गेले, त्यानंतर ग्रुपऑन इंडियाचे सीईओ झाले आणि आज एक यशस्वी कंटेंट क्रिएटर आहेत. त्यांची कोट्यवधींची ऑडियन्स आहे. त्यांचा विश्वास आहे, की करिअर ही सरळ रेषा नसून एक प्रवास आहे, जेथे प्रत्येक टप्प्यावर स्वतःला नव्याने घडवावे लागते. त्यांनी वारंवार रिस्क घेतला आणि प्रत्येक वेळी काहीतरी नवीन शिकले.

त्यांच्या करिअरची सुरूवात अंतरिक्ष आणि ताऱ्यांच्या अभ्यासातून झाली होती. पण हळूहळू त्यांचा ओढा व्यवसायाकडे वाढला. त्यांनी दाखवून दिले, की एका क्षेत्रात शिकलेली कौशल्ये दुसऱ्या क्षेत्रातही उपयोगी पडू शकतात. त्यांची विश्लेषणात्मक विचारसरणी त्यांना बिझनेसमध्ये पुढे जाण्यास मदत झाली. ते म्हणतात, की वयाच्या २० व्या वर्षी आयुष्यात नेमके काय करायचे हे ठरले नसेल, तरी ते पूर्णपणे नॉर्मल आहे. महत्त्वाचे म्हणजे थांबू नका, सतत शिकत राहा आणि प्रयोग करत राहा.

अंकुर वारिकू यांना अनेक वेळा लोकांनी इशारा दिला, की ते त्यांच्या करिअरमध्ये मोठा धोका घेत आहेत. पण त्यांनी त्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले. त्यांचा एक प्रसिद्ध विचार आहे, की 'जर तुम्ही एखाद्या खोलीत सर्वांत हुशार व्यक्ती असाल, तर तुम्ही चुकीच्या खोलीत आहात.' याचा अर्थ असा की नेहमी अशा वातावरणात राहा जेथे तुम्हाला नवीन शिकायला मिळेल आणि स्वतःला सुधारता येईल. त्यांनी अनेकदा शुन्यातून सुरूवात केली आणि हेच त्यांच्या यशाचे गुपित ठरले.

शिक्षण आणि करिअरबाबत त्यांचे तीन गोल्डन रूल्स खूप प्रेरणादायी आहेत. पहिला अपयशाला घाबरू नका, कारण तेच तुम्हाला योग्य दिशा दाखवते. दुसरा सतत शिकत राहा. कारण आजच्या काळात कौशल्ये लवकर बदलतात आणि तिसरा स्वतःच्या निर्णयांची जबाबदारी घ्या, कारण शेवटी तुमचे आयुष्य तुमच्या निर्णयांवरच उभे असते. त्यांच्या प्रवासातून एकच गोष्ट स्पष्ट होते. करिअरमध्ये बदल करणे ही कमजोरी नाही, तर योग्य दृष्टिकोन असेल तर तीच तुमची सर्वांत मोठी ताकद ठरू शकते.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम
सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे






# तुकोबांची होळी

मी होळीत काय आणि का जाळले?
याविषयी तुकोबाराय सांगतात,
**दैन्य दुःख आम्हां न येती जवळीं ।**
**दहन हे होळी होती दोष ॥**
लोक होळीत शेणाच्या गोवऱ्या, लाकडे जाळतात.
'मी होळीत माझ्यातील 'दोष' जाळले. आणि दोष जाळण्याचा परिणाम असा झाला, की दारिद्र्य आणि दुःख माझ्या जवळसुद्धा येत नाही.'
दोष नाही, तर दारिद्र्य नाही. त्यामुळे दारिद्र्यातून निर्माण होणारे दुःख नाही.
**सर्व सुखें येतीं मानें लोटांगणी ।**
**कोण यासी आणी दृष्टिपुढें ॥**
'दुख्ख तर जवळ येतच नाही, उलट सुख माझ्यापुढे लोटांगण घालतात आणि आम्हाला येऊ द्या म्हणतात. पण मी त्यांना माझ्या डोळ्यासमोरही उभे करत नाही.'
सगळे जग सुखाच्या मागे लागलेले असताना तुकोबाराय सुखाला हाकलून लावतात. कारण त्यांना सुखाची हाव नाही आणि दोष जाळल्यामुळे दुःख तर आधीच दूर पळून गेलेले आहे.
**आमुची आवडी संतसमागम ।**
**आणीक तें नाम विठोबाचें ॥**
मला सुखाची अपेक्षा का नाही? तर,
'संतांचा सहवास आणि विठोबाचं नाव, एवढ्याचीच मला आवड आहे.'
**आमचें मागणें मागों त्याची सेवा ।**
**मोक्षाची निर्देवा कुणा चाड ? ॥**
'मला मागायचंचअसेल, तर मी सुख नाही मागणार. फक्त 'संतांचा सहवास आणि विठोबाचे नाव' एवढेच मागेल. याच्यापुढे तर मला मोक्षसुद्धा नको. या सुखापुढे मोक्षाची आवड कुण्या दुर्दैवी माणसाला राहील?'
**तुका म्हणे पोटीं सांठविला देव ।**
**न्यून तो भाव कोण आम्हां ? ॥**
'मी माझ्या पोटातच विठ्ठलाला साठवून ठेवलं आहे. वैकुंठ देणारा विठ्ठलच माझ्यात साठवून घेतल्यामुळे, मला आता कशाची कमतरता?'
सगळे भरून पावल्यासारखेच आहे. म्हणून मला मोक्ष नको. अर्थात मोक्षानंतर मिळणारे वैकुंठही नको.

**संत तुकाराम बीज विशेष**

# वारकरी संप्रदायाचा अखंड ज्ञानदीप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या संतपरंपरेत ज्यांनी अभंग वाङ्मयाच्या माध्यमातून समाजमनाला जागृत केले, अध्यात्माला लोकभाषेत आणले आणि भक्तीला जीवनाशी जोडले त्या संत तुकाराम महाराजांची पुण्यतिथी 'तुकाराम बीज' म्हणून साजरी केली जाते. तिथीनुसार फाल्गुन वद्य द्वितीयेला येणारा हा दिवस वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या दिवशी संत तुकाराम महाराजांनी देह ठेवून वैकुंठगमन केले, अशी श्रद्धा आहे.

## जीवनप्रवास : दुःखातून उगवलेले संतत्व

संत तुकाराम महाराजांचा जन्म सुमारे इ.स. १६०८ मध्ये पुणे जिल्ह्यातील देहू येथे झाला. ते वाणी समाजातील होते. त्यांच्या वडिलांचे नाव बोल्होबा आणि आईचे नाव कण्होबाई. घराण्यात विठ्ठलभक्तीची परंपरा होती. लहान वयातच आई-वडिलांचे निधन, दुष्काळ, व्यापारातील तोटा, संसारातील संकटे अशा अनेक दुःखांनी त्यांचे आयुष्य वेढले. या संकटांनीच त्यांच्या मनात वैराग्याची ज्योत प्रज्वलित केली. सांसारिक दुःखातून मुक्तीचा मार्ग त्यांनी नामस्मरणात आणि भक्तीत शोधला.

## अभंगवाणी : लोकभाषेतील अध्यात्म

संत तुकाराम महाराजांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी संस्कृत किंवा कठीण भाषेऐवजी सर्वसामान्यांना समजेल अशा मराठीत अभंग रचले. त्यांच्या अभंगांतून समाजसुधारणा, आत्मपरीक्षण, नैतिकता आणि खरी भक्ती यांचा संदेश मिळतो. त्यांच्या प्रसिद्ध अभंगांपैकी काही ओळी आजही प्रत्येक वारकऱ्याच्या ओठांवर आहेत–
**'आता विश्वात्मका देवा, तुझे नाम घेता जिवा...'**
**'जाची वाणी निर्मळ, तोचि देव जाणावा...'**
तुकारामांनी कर्मकांड, आडंबर आणि ढोंगीपणावर कठोर प्रहार केला. त्यांनी सांगितले, की खरी भक्ती ही अंतःकरणातील शुद्धतेत असते, बाह्य दिखाव्यात नाही.

## वारकरी संप्रदायातील स्थान



वारकरी संप्रदायाची परंपरा संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांच्यापासून पुढे येत संत तुकाराम महाराजांनी अधिक व्यापक केली. त्यांनी भक्तीला समाजजागृतीचे रूप दिले. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिर पंढरपूर येथे जाणाऱ्या वारी परंपरेला त्यांनी प्रेरणा दिली. त्यांच्या अभंगांमुळे वारकरी संप्रदायाला सशक्त विचारसंपदा मिळाली.

## वैकुंठगमनाची कथा

वारकरी परंपरेनुसार फाल्गुन वद्य द्वितीयेला संत तुकाराम महाराज कीर्तन करीत असताना भगवान विठ्ठलांनी त्यांना साक्षात दर्शन दिले आणि गरुडावर आरूढ होऊन त्यांना वैकुंठात नेले. ही घटना भक्तांसाठी श्रद्धेचा आणि आध्यात्मिक उत्कर्षाचा प्रतीक मानली जाते.

## तुकाराम बीजचे महत्त्व

तुकाराम बीजनिमित्त देहू येथे मोठा सोहळा भरतो. कीर्तन, भजन, अभंगगायन, पालखी सोहळा यांद्वारे संतांच्या स्मृतींना उजाळा दिला जातो. महाराष्ट्रभर वारकरी दिंड्या काढून नामस्मरण करतात. हा दिवस आपल्याला काही मूलभूत मूल्यांची आठवण करून देतो

## साधेपणा आणि प्रामाणिकता

–समता आणि बंधुता
– नामस्मरणाची शक्ती
– अहंकाराचा त्याग

## आजच्या काळातील तुकाराम विचार

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात संत तुकारामांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. समाजात वाढती असहिष्णुता, भेदभाव आणि स्वार्थ यावर उपाय म्हणून त्यांनी दिलेला 'समता, प्रेम आणि भक्ती'चा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.

तुकाराम महाराजांनी सांगितले, की
**'तुका म्हणे धावा विठ्ठलाकडे, सोडुनी देहाभिमान...'**
त्यांच्या अभंगांतून व्यक्त होणारी आत्मनिष्ठा आणि समाजहिताची भावना आपल्याला अंतर्मुख करते.
संत तुकाराम बीज हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर आत्मपरीक्षणाचा आणि समाजजागृतीचा दिवस आहे. संत तुकाराम महाराजांनी दिलेली शिकवण म्हणजे जीवनाला दिशा देणारा दीपस्तंभ आहे. संत तुकाराम महाराजांच्या स्मृतींना दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे अभिवादन..!
**'तुका म्हणे, माझे काही नाही; सर्व काही पांडुरंगाचे आहे.'**


# समाधिस्थळावरील श्री दत्त मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुण्यातील अनेक पुरातन वास्तुंपैकी एक म्हणजे तुळशीबागेतील श्रीराम मंदिर. तुळशीबागेतील श्रीराम मंदिर माहीत नाही, असा एकही पुणेकर नसेल. पण याच श्रीराम मंदिर परिसरात एक दत्त मंदिरही आहे. हे फार कमी लोकांना माहिती असेल. तुळशीबागेतील दत्त मंदिराविषयी जाणून घेऊया.

श्रीमंत नारो आप्पाजी तुळशीबागवाले हे पेशवाईतील नामांकित व कर्तबगार अधिकारी होते. त्यांचे मूळ नाव नारायण आप्पाजी खिरे. त्यांचे वडील सातारा जिल्ह्यातील पाडळी गावचे जोशी-कुलकर्णी होते. एकदा आईवर रुसून नारोजी पुण्याला आले व तेथेच त्यांची सरदार गोविंदराव खासगीवाले यांच्याशी गाठ पडली. गोविंदरावांनी लहानग्या नारायणाला आश्रय दिला. आज ज्या ठिकाणी श्रीराम मंदिर आहे तेथे पूर्वी सरदार गोविंदरावांची तुळशीची बाग होती. त्या बागेतून नारायण त्यांना रोजच्या देवपूजेसाठी तुळस आणि फुले तोडून आणून देत असे. आपल्या कामातील मेहनतीच्या बळावर त्यांनी खासगीवाल्यांचा विश्वास संपादन केला. त्याची कामातील निष्ठा पाहून पुढे खासगीवाल्यांनी त्यांना पेशव्यांच्या खासगीतील हिशेब वगैरे करण्यासाठी चाकरीत सामावून घेतले. पुढे नानासाहेब पेशव्यांनी नारो आप्पाजींची कामाची पद्धत, शिस्त, वागणूक आणि चोख हिशेब वगैरे पाहून त्यांना कोठी खात्याच्या कारकून पदावर नेमले. इ.स.१७५० मध्ये नानासाहेब पेशव्यांनी यांना पुणे प्रांताचे सरसुभेदार नेमले.

१७५० साली पुण्यात एक श्रीरामांचे मंदिर असावे, असे नारो आप्पाजींच्या मनात आले. यासाठी त्यांनी खासगीवाल्यांकडून एक एकरभर पसरलेली तुळशीबाग विकत घेतली. सर्व जागा



तुळशी वगैरे काढून मोकळी केली गेली. त्याला तटबंदी बांधली आणि पेशव्यांकडे श्रीराम मंदिर बांधण्याची परवानगी मागितली. नानासाहेबांनी ही मागणी मंजूर केली. माघ महिन्यात या मंदिराच्या बांधकामास सुरूवात झाली. तुळशीबागेचे मालक झाल्यामुळे त्यांना 'तुळशीबागवाले' म्हणून लोक संबोधू लागले आणि त्यांचे खिरे हे आडनाव लोप पावले. पानिपतच्या पराजयाने खचून नानासाहेब पेशव्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने हे बांधकाम थांबले. पण थोरले माधवराव पेशवे झाले आणि काही दिवसांनी स्वतः त्यांनी तुळशीबागवाल्यांना बोलावून श्रीराम मंदिराचे बांधकाम पुन्हा सुरू करण्याची आज्ञा दिली. १७६३ सालच्या अखेरीस मंदिराच्या गाभाऱ्याचे बांधकाम पूर्ण झाले आणि विधीपूर्वक समारंभाने मंदिरास उंबरा बसविण्यात आला. सन १७६५ मध्ये श्री उमाजीबाबा पंढरपूरकर यांनी घडवलेल्या प्रभू श्रीरामचंद्र, लक्ष्मण व सीता माता यांच्या मूर्तींची स्थापना करण्यात आली.

तुळशीबागेच्या उत्तर दरवाज्यातून देवळात येताना मध्येच संगीन दरवाजा आहे. पेशव्यांनी खर्ड्याच्या संग्रामात यशप्राप्ती झाली तर तुझ्या दारात चौघडा सुरू करीन, असा रामरायास नवस केला होता. त्यानुसार युद्धात विजय मिळताच श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनी नगारखान्याची दुमजली इमारत आहे. आजही श्रीरामांच्या दारी चौघडा तिन्ही त्रिकाळ म्हणजे पहाटे, सायंकाळी व मध्यरात्री वाजवतात. शिवाय, दर शनिवारी तिसऱ्या प्रहरी म्हणजे दुपारी तीन वाजता वाजवला जातो. याचे कारण असे सांगतात, की पुणे पेशव्यांना शनिवारी तिसऱ्या प्रहरी मिळाले.

श्रीराम मंदिराच्या परिसरात गणपती, महादेव, मारुती, विठ्ठल-रुक्मिणी अशी अनेक लहान मंदिरे आहेत. त्यात श्री दत्त मंदिराचाही समावेश आहे. श्रीमंत नारो आप्पाजी यांचे नातू नारायणराव रामचंद्र ऊर्फ नानासाहेब तुळशीबागवाले यांनी संन्यास दीक्षा घेतली होती. ११ नोव्हेंबर १८५१ रोजी ते समाधिस्थ झाले. त्यांना 'ब्रह्मीभूत नारायण' असे म्हणत असत. त्यांच्या समाधीवर श्री दत्त महाराजांच्या अभिषेकाचे चरणतीर्थ नित्य पडावे या उद्देशाने त्यांच्या समाधीवर श्रीमती भागीरथीबाई सहस्रबुद्धे यांनी १८९४ मध्ये हे दत्त मंदिर बांधून दिले. श्री दत्तात्रयांच्या मूर्तीखालीच नारायणरावांची समाधी आहे. समाधीवर उभारलेले असल्याने या मंदिराला कळस नाही. या दत्त मंदिराचा मंडप पूर्वी शेषशायीचा मंडप होता. त्याला यज्ञमंडप म्हणतात. श्रीराम मंदिराच्या स्थापनेवेळी झालेले होमहवन याच मंडपात केल्याचे सांगतात.

मला असे वाटते, की बहुतेक समाधीवर उभारण्यात आलेले हे एकमेव दत्त मंदिर असेल. कुणास ठाऊक. अजून खूप दत्त मंदिरे पाहायची आहेत, त्यांचा इतिहास, उभारणीमागील प्रेरणा जाणून घ्यायची आहे. त्यावर लिहायचे आहे. महाराजांच्या अशा अधिकाधिक वैशिष्ट्यपूर्ण स्थानांना भेट देण्याचा योग येवो, येतच राहो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री स्वामी समर्थ प्रत्यक्ष कसे वागत, कसे दिसत व कसे चालत याबद्दल वाचकांना कुतूहल असणे स्वाभाविक असल्याने आपण 'श्रीं'च्या रूपवर्णनाकडे वळू. श्री स्वामी समर्थांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे ते दाशरथी रामाप्रमाणे आजानुबाहू होते. त्यांची उंची सहा फुटांपेक्षाही अधिक होती. विशाल उदर, रुंद खांदे, तीक्ष्ण भेदक नजर आणि पांढऱ्याशुभ्र भुवया ही त्यांची आणखी काही वैशिष्ट्ये. 'श्रीं'चा वर्ण गव्हाळ असून, कांती इतकी तेजस्वी होती की त्यांच्याकडे एकसारखे टक लावून पाहणे देखील शक्य होत नसे. त्यांच्या तीक्ष्ण नजरेत विलक्षण जरब होती. त्यांचा रागही असा भयंकर की, एकदा विश्वासराव मान्यांसारखे शूर सरदार म्हणाले, की 'प्रसंग पडल्यास आम्ही वाघाच्या अंगावर चालून जाण्यास भिणार नाही, परंतु श्री समर्थांपुढे उभे राहण्यासही आम्हास धैर्य होत नाही, ते रागावल्यावर जाळून भस्मच करतील, असे भय वाटते!'

'श्रीं'चे कर्ण मंगलमूर्तीप्रमाणे मोठे असून, त्यांची नाजूक पाळी श्रींच्या प्रत्येक हालचालींबरोबर मागे-पुढे हलत असत. हसताना पोट धरून हसण्याची सवय असून, बोलणे अल्प असे. बोलणे बहुधा मराठी किंवा हिंदीतून होई. त्यांची काया जुनाट वाटत असली तरी उत्साह तरुणाला लाजविणारा असा होता. त्यांचे एकंदर शरीर गुलाब पुष्पाप्रमाणे सुकोमल असून त्यांच्या पायास हात लावल्यावर असे वाटे, की यांच्या पावलास हाडे मुळीच नसावीत. त्यांच्या कपाळी चंदनाचा भव्य टिळा, गळ्यात तुळशी वा रुद्राक्ष यांच्या माळा असत. त्यांचे सेवेकरी त्यांना कौपीन नेसवीत. डोक्यावर जरीची कानटोपी घालीत आणि अंगावर शाल पांघरीत; परंतु कोणत्या क्षणी स्वामी महाराज या सर्व वस्तू फेकून देऊन दिगंबर बनतील याचा नेम नसे. असा हा अवधूत श्रीसमर्थांच्या रूपात जणू पुन्हा एकदा भूतलावर प्रकटला होता की काय कुणास ठाऊक!

## श्री समर्थ कोण होते?

'मूळ पुरुष-वडाचे झाड-दत्त नगर-मूळ-मूळ' अशा गूढ शब्दांत स्वतःची माहिती सांगणाऱ्या श्री स्वामी समर्थांचे चरित्र असेच गूढ आणि अतर्क्य घटनांनी ओतप्रोत भरलेले आहे. ते कोण, कोठले, त्यांचे आई-बाप कोण याचा काहीच थांगपत्ता लागत नाही. मात्र हा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांच्या काळात काही निकटच्या भक्तांनी करून पाहिला. एकदा चिंतोपंत टोळांच्या घरी स्वामी समर्थांचा मुक्काम असताना



# 'श्रीं'चा आजानुबाहू देह

"श्रीं'ची स्वारी घराबाहेरील अंगणात बिछान्यावर पहुडली होती. मंडळींशी गप्पा सुरू होत्या. त्या नादात मध्यरात्र केव्हा झाली हे कुणालाच समजले नाही. तेवढ्यात श्रीसमर्थांनी खड्या आवाजात एक जुनी लावणी चालीवर म्हणावयास सुरूवात केली.
गोरे ग रूप तुझे। तुला पाहिले।
सात ताल माडीवरी।।
'श्रीं'च्या तोंडी ही शृंगारिक लावणी पाहून सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटले. तेवढ्यात चिंतोपंतांनी थोडे धाडसकरून विचारले, 'महाराज, आपण पूर्वाश्रमी गृहस्थ होता असे वाटते. आपण आपली जात कोणती हे कृपा करून सांगाल का?' त्यावर श्री समर्थ चटकन म्हणाले, 'आमची जात चांभार, आई महारीण आणि बाप महार.' एवढे सांगून ते पोट धरधरून खो-खो हसत सुटले. पुढे मात्र एकदा कर्वे नावाच्या एका गृहस्थांनी या संदर्भात खुलासेवार सांगण्याची विनंती केल्यावर दत्तावधूत यतिराज त्यांना म्हणाले – 'आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण. आमचे नाव नृसिंह, काश्य गोत्र, आमची मीन राशी, पुन्हा विचारल्यास टाळक्यात पायपोस.' स्वामी समर्थांची जी पत्रिका नाना रेखी यांनी तयार केली तिला स्वामी समर्थांनी मान्यता दिली होती, त्या पत्रिकेवरही 'नृसिंहभान' असेच टोपण नाव आढळते; मात्र श्री समर्थांनी आपली राशी मीन असे का सांगितले याचे कोडे उलगडत नाही. वास्तविक त्यांचे जन्म लग्न मीन आहे. त्यामुळे त्यांना आपली लग्नराशी अभिप्रेत असावी असे वाटते. कारण सदर पत्रिकेत त्यांची चंद्राशी मेष दाखविली आहे. तसेच, सदर पत्रिकेत यजुर्वेदी ब्राह्मण, कश्यप गोत्र असेच लिहिले आहे. ही पत्रिका पाहिल्यावर 'नौबत बजाव' असे शब्द श्रीमुखातून बाहेर पडले व दक्षिणा म्हणून श्री समर्थांनी नानाजींच्या उजव्या हातावर आत्मलिंगाचा प्रसाद दिला. त्याच वेळी त्यांच्या हातावर नीलवर्णाचे लहानसे विष्णुपाद उमटले. ते मरेपर्यंत त्यांच्या हातावर होते, असे म्हणतात. श्री समर्थ हे खरे तर जगद्गुरू होते. जात-पात-धर्म या सर्वांच्या पलीकडे जाऊन त्यांनी विश्वोद्धाराचे कार्य केले. तथापि त्यांच्या तोंडी वेदमंत्र, दोहे आणि गीतेतील बरेच संस्कृत श्लोक नित्य असत. त्यावरून ते ब्राह्मण असावेत, असा त्यांच्या भक्तांचा तर्क असून, श्री नृसिंह सरस्वती म्हणजेच श्री स्वामी समर्थ ही गोष्ट ओघानेच मान्य करावी लागते; मात्र माझी जात चांभार, बाप महार आणि आई महारीण असे सांगून श्री समर्थांनी जातिभेदाच्या संकुचित कल्पनांमध्ये अडकलेल्या लोकांना चांगलाच धडा शिकविला आहे, असा निष्कर्ष काढल्यास तोही चुकीचा ठरू नये.

## तेजस्वी शिष्यपरंपरा

श्री स्वामी समर्थांच्या दिव्य चरित्राला एखाद्या हिऱ्याप्रमाणे अनेक तेजस्वी पैलू आहेत. त्यात त्यांनी निर्माण केलेली तेजस्वी शिष्यपरंपरा हा पैलू तर विशेषच तेजस्वी आहे. त्यांनी गुरुपदेश मागणाऱ्या ठाकूरदासबुवांना उद्देशून 'हमकू कायकू सताता, हम पंतोजीपण नही करता, नाटके गुरू, बाटके चेले हम करते नहीं' असे उद्गार काढले असले तरी केवळ दृष्टिक्षेपात संकल्पदीक्षा देऊन त्यांनी गतजन्मीच्या अनेक योगभ्रष्टांना मार्गास लावले ही वस्तुस्थिती आहे. अशी 'संकल्प दीक्षा' देणारे सद्गुरू या भूतलावर क्वचितच कुठे निर्माण होतात. कोणताही विधी न करता, स्वशिष्याचा सर्वोद्धार व्हावा अशा नुसत्या संकल्पानेच त्याला कृतार्थ करणे, जीवन्मुक्त करणे या दिक्षाप्रकाराला "संकल्प दीक्षा' असे म्हणतात. संकल्प देव तू या दीक्षेच्या द्वारे त्यांनी अगदी सामान्यातल्या सामान्य अशा एका मुस्लिम भक्ताला त्याच्या सेवेवर संतुष्ट होऊन महान अवलिया बनविले. इतर गुरूंप्रमाणे दीक्षा देण्याचा एखादा 'विधी' श्री समर्थांनी कधी केला असेल असे वाटत नाही; परंतु केवळ दृष्टिकटाक्ष टाकून संकल्पानेच त्यांनी योग्य त्या व्यक्तींना दिशा दिली आणि पाहता-पाहता लोहाचे बावनकशी सुवर्ण बनले. या शिष्यांचे धगधगीत वैराग्य, खडतर तपश्चर्या, अपार गुरुभक्ती, उज्ज्वल चारित्र्य, लोकविलक्षण त्याग, ज्वलंत निष्ठा इत्यादी गोष्टी खरोखरच आदर्श होत्या. एका दीपाने हजारो दीप प्रज्वलित व्हावेत त्याप्रमाणे समर्थरूपी ज्ञानदीपाने अनेकांच्या हृदयातील आत्मज्ञानरूपी दीप प्रज्वलित करून त्यांच्या मानवजन्माचे सार्थक केले. एवढेच नव्हे तर ती शिष्यपरंपरा पुढेही चालत राहून हजारो मुमुक्षूंचा त्यायोगे उद्धार झाला आणि अध्यात्मप्रांतात जणू दिवाळीचा थाटच उडाला. या आदर्श' शिष्यवर्गाची संख्या सहज पंचविसाच्या घरात जाईल. यामध्ये श्री बीडकर महाराज, श्री शंकर महाराज आणि काळबोवा (पुणे), श्री नृसिंह सरस्वती (आळंदी), श्री सीताराम महाराज (मंगळवेढे), श्री देव मामलेदार (नाशिक), श्री रांगोळी महाराज (मालवण), श्री कृष्ण सरस्वती (कोल्हापूर), श्री स्वामीसुत (मुंबई), श्री बाळप्पा महाराज (अक्कलकोट), ब्रह्मनिष्ठ वामनबुवा (बडोदे), धोंडिबा पलुस्कर (पलुस) आणि श्री गजानन महाराज (शेगाव) इत्यादी अनेक नावे सहजपणे सांगता येतील. या शिष्यवृंदांची चरित्रेही साधकांना सदैव स्फूर्ती देत राहतील यात तिळमात्र शंका नाही.

अशा प्रकारे श्रीसमर्थांचे खरे अवतारकार्य अक्कलकोट येथेच झाले. या ठिकाणी ते सुमारे एकवीस ते बावीस वर्षे होते. या काळात त्यांनी हजारो आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू आणि मुमुक्षू यांच्या मनोकामना पूर्ण केल्या. नास्तिकांना चमत्कारांच्या द्वारे ईशशक्तीची जाणीव करून देत ईशसेवेला लावले. दुष्टांना सुष्ट बनविले. ढोंग्यांचे ढोंग उघड करून अज्ञ जनांना खऱ्या ईश्वरनिष्ठांची ओळख करून दिली. अनेक व्याधिग्रस्तांच्या व्याधी दूर केल्या. अशा प्रकारे जगाची विस्कटलेली घडी पूर्ववत बसविण्यासाठी, निष्ठावान भक्तांना आत्मानंदाची प्राप्ती करून देण्यासाठी आणि जगात सद्धर्म, सुसंस्कृती अन् भक्तिप्रेमाची गुढी उभारण्यासाठीची अनंत लीला करून श्री समर्थांनी आपल्या तेजस्वी अवतारकार्याची सांगता केली.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**